# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

श्री बालमुकुन्द लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केन्द्र

१२४२ सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०.

# संस्कृत पारङ्गत

# M.A. in Sanskrit

## सविस्तर अभ्यासक्रम पुस्तिका

प्रथम वर्ष

First Year

नवीन अभ्यासक्रम (२०१९ – २० पासून)

# संस्कृत पारंगत

# M.A. in Sanskrit

सदर अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून चार सत्रांमध्ये विभागलेला आहे. प्रत्येक सत्राअखेर विद्यार्थ्यांची त्या सत्राकरिता नेमलेल्या चार विषयांवर आधारित परीक्षा घेतली जाते. प्रथम आणि द्वितीय सत्रातील सर्व विषय अनिवार्य आहेत. तृतीय आणि चतुर्थ सत्राकरिता सर्व विषय वैकल्पिक आहेत. परंतु, या दोन सत्रांकरिता विशेष अभ्यासाचा विषय म्हणून कोणत्याही एका गटातील (दर्शन, साहित्य इ.) दोन विषय निवडणे आवश्यक आहे. असा तृतीय सत्रात निवडलेला गट चतुर्थ सत्रात बदलता येणार नाही. चार पैकी असे दोन विषय (एक गट) निश्चित केल्यावर उर्वरित दोन विषय अन्य गटांतून अथवा गटांव्यतिरिक्त उपलब्ध असलेल्या विषयांमधून निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना असेल. अभ्यासक्रमात नेमलेल्या वैकल्पिक विषयांपैकी ठराविक विषयच उपलब्ध करून देण्याचा निर्णय विभागातर्फे त्या त्या वर्षी घेतला जाऊ शकतो. त्या त्या वर्षी उपलब्ध करून दिलेल्या विषयांतून विद्यार्थ्यांनी विषय निवडावयाचे आहेत. R असलेला संकेतांक नियमित, तर E असलेला संकेतांक बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी आहे.

### प्रथम सत्र

**प्रश्नपत्र १ अनिवार्य विषय 19R3101/19E3101 सांख्यकारिका आणि योगसूत्रे**

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी भारतीय दर्शनांमधील सांख्य आणि योग अशा दोन प्रमुख विचारधारांचा परिचय करून घेणे अपेक्षित आहे. सांख्यकारिका आणि योगसूत्रे हे क्रमशः सांख्य आणि योग या दोन दर्शनांचे आधारभूत ग्रन्थ मानले जातात. त्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा. नेमलेल्या भागातील कारिका आणि सूत्रांमध्ये वर्णित विषय तसेच आवश्यक तिथे व्याकरणशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचे स्पष्टीकरण यांचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रमामध्ये नेमलेला भाग पुढील प्रमाणे-

अ. भारतीय दर्शनांची तोंडओळख

आ. सांख्यकारिका या ग्रन्थाचा आणि रचयिता ईश्वरकृष्ण यांचा परिचय

इ. योगसूत्रांचा आणि रचयिता पतंजली यांचा परिचय

ई. नेमलेल्या भागाचा अभ्यास-

१. सांख्यकारिका (संपूर्ण)

२. योगसूत्र (समाधिपाद)

**सन्दर्भग्रन्थसूची**

१) Shastri, Jagannath (tr.) 1966. *Sāṅkhyakarikā*. New Delhi: Motilal Banarsidass.

२) Arjunwadkar, K. S. (tr.) 2006. *Yogasūtras of Patañjali*. Pune: Bhandarkar Oriental Research Institute.

२) उमाशंकर ऋषी. १९६४. *सर्वदर्शनसंग्रह.* वाराणसी: चौखम्बा संस्कृत सीरिज.

३) शास्त्री, गुरुप्रसाद, सीतारामशास्त्री आणि बालशास्त्री (अनु.) २०१८. *श्रीमदीश्वरकृष्णप्रणीता गौडपादभाष्यसमन्विता सांख्यकारिका.* वाराणसी: चौखम्बा सुरभारती प्रकाशन.

४) त्रिपाठी, श्रीकृष्णमणि (अनु.) २००८. *सांख्यकारिका.* वाराणसी: चौखम्बा सुरभारती प्रकाशन.

५) भट्टाचार्य, रामशंकर (शम्पा.) आणि अमलधारी सिंह (अनु.) २०१८. *भोजदेवकृतराजमार्तण्डवृत्तिसमेतं पातञ्जलयोगसूत्रम्.* दिल्ली: भारतीय विद्या प्रकाशन.

**प्रश्नपत्र २ अनिवार्य विषय 19R3102/19E3102 साहित्यदर्पण**

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी विश्वनाथविरचित साहित्यदर्पण या ग्रन्थाचा परिचय करून घेणे अपेक्षित आहे. अभ्यासात या ग्रन्थातील नेमलेल्या भागातील साहित्यशास्त्रविषयक संकल्पनांचा तसेच आवश्यक तिथे व्याकरणशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचे स्पष्टीकरण यांचा समावेश असेल. विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे अभ्यास करावा.

अ. प्राचीन भारतातील साहित्यशास्त्रीय परंपरेची तोंडओळख

आ. विश्वनाथ आणि साहित्यदर्पण- काल आणि सामान्य परिचय

इ. निवडक भागाचा अभ्यास- साहित्यदर्पणाचा सहावा परिच्छेद

**सन्दर्भग्रन्थसूची**

१) Kane, P. V. 1923. *The Sāhityadarpaṇa of Viśvanātha*. Second edn. Bombay: P. V. Kane.

२) गद्रे, रा. ना. (सम्पा.) *साहित्यदर्पण* (भाग २). पुणे: आयडियल बुक सर्व्हिस.

२) दलाल, लोकमणी आणि त्रिलोकीनाथ द्विवेदी. *साहित्यदर्पण.* वाराणसी: चौखम्बा सुरभारती प्रकाशन.

३) शालिग्रामशास्त्री (अनु.) २०१६. *श्री विश्वनाथकविराजकृतः साहित्यदर्पणः*. दिल्ली: मोतीलाल बनारसीदास.

**प्रश्नपत्र ३ अनिवार्य विषय 19R3103/19E3103 स्वप्नवासवदत्त**

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी भासविरचित स्वप्नवासवदत्त या नाटकाचे अध्ययन करणे अपेक्षित आहे. प्रस्तुत नाटकाचा साहित्यशास्त्रदृष्ट्या आणि व्याकरणदृष्ट्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

अ. नाटककार भासाचा काळ आणि त्याच्या साहित्याची तोंडओळख

आ. स्वप्नवासवदत्त नाटकाची कथावस्तु आणि महत्त्वाची पात्रे, साहित्यशास्त्रीय महत्त्व

इ. संपूर्ण स्वप्नवासवदत्त नाटकाचे अध्ययन

**सन्दर्भग्रन्थसूची**


१) Kale, M. R. (tr.) 1987. *Svapnavāsavadatta of Bhāsa*. Delhi: Bharatiya Vidya Prakashan.

२) झा, बालगोविंद (अनु.) १९८९. *स्वप्नवासवदत्तम्.* कमलेश्वरी संस्कृत-हिंदी व्याख्योपेतम्. वाराणसी: कृष्णदास अकादमी.

३) शेषराजशर्मा. १९८०. *महाकविभासप्रणीतं स्वप्नवासवदत्तम्.* चन्द्रकला संस्कृत-हिंदीव्याख्योपेतम्. वाराणसी: चौखम्बा सुरभारती प्रकाशन.

४) देवधर, चिंतामण रामचन्द्र (सम्पा आणि अनु.) १९५७. *भासकृतं स्वप्नवासवदत्तम्.* प्रस्तावना, भाषांतर आणि विस्तृत टिप्पणींसहित. पुणे: पूना ओरिएंटल बुक हाउस.

५) गद्रे, रा.ना. (सम्पा आणि अनु.) १९५७. *महाकविभासविरचितं स्वप्नवासवदत्तम्.* मूळ संहिता, संपूर्ण मराठी भाषांतर, विवेचक प्रस्तावना, विवरणात्मक टीपा, प्रत्येक अंकाचा सारांश व रसास्वाद शिवाय अनेक उपयुक्त परिशिष्टे यांसह. पुणे: आयडियल बुक सर्व्हिस.

६) भट, गो. के. १९९०. *संस्कृत नाटके आणि नाटककार.* पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

७) भट, गो. के. १९६४. *संस्कृत नाट्यसृष्टी.* पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन.


**प्रश्नपत्र ४ पायाभूत विषय 19R3104/19E3104 सामान्य व्याकरण**

प्रस्तुत विषयामध्ये संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा विद्यार्थ्यांनी परिचय करून घेणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी पुढे दिल्याप्रमाणे सामान्य व्याकरणाचा अभ्यास करावा.

अ. सन्धिप्रकार-

१) स्वर, विसर्ग आणि व्यंजन सन्धींची सोदाहरण ओळख

आ. विभक्तिरूपे-

१) स्वरान्त आणि व्यंजनान्त शब्द (तीनही लिंगे)

२) सर्वनामे- तद्, एतद्, यद्, किम्, अस्मद्, युष्मद्, इदम्, अदस् आणि सर्व

३) संख्यावाचक शब्द- क्रमवाचक आणि आवृत्तिवाचक

इ. क्रियापदरूपे-

१) गण १ ते १० यांमधील सोपसर्ग धातूंची सर्व लकारांची रूपे

२) धातुसाधित विशेषणे आणि अव्यये

३) प्रयोगरचना- कर्तृवाच्य, कर्मवाच्य आणि भाववाच्य

४) उपपद विभक्ती

ई. समासप्रकार- अव्ययीभाव, द्वन्द्व, तत्पुरुष आणि बहुव्रीही या चारही प्रकारांची ओळख

उ. भाषान्तर

१) संस्कृतमधून माध्यमभाषेमध्ये आणि माध्यमभाषेमधून संस्कृतात- गद्यरचना (वाक्ये, उतारे आणि संवाद)

२) संस्कृतमधून माध्यमभाषेमध्ये- पद्यरचना

**सन्दर्भग्रन्थसूची**

१) जोशी, प्र. शं. १९९६. *सुगम संस्कृत व्याकरण.* आवृत्ती दुसरी. पुणे: नितीन प्रकाशन.

२) देसाई, राजाराम दामोदर. २००७. *संस्कृतप्रवेशः.* सोळावी आवृत्ती. पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

३) बोरवणकर, गणेश रामचंद्र. १९५१. *व्यावहारिक संस्कृत व्याकरण.* मुंबई: हिंद प्रकाशन.

४) करमली, रोहन, धनश्री शेजवलकर, संध्या कापडी आणि रोहिणी केतकर (सम्पा.) २०१७. *पदज्योत्स्ना १.* प्राथमिकसंस्कृत-व्याकरणमधिकृत्य अभ्यासपुस्तिका. पुनर्मुद्रण. पुणे: त्रिधारा प्रकाशन.

५) करमली, रोहन, धनश्री शेजवलकर आणि विनया देव (सम्पा.) २०१९. *पदज्योत्स्ना २.* प्राथमिकसंस्कृतव्याकरणमधिकृत्य अभ्यासपुस्तिका. द्वितीयावृत्ती. पुणे: त्रिधारा प्रकाशन.

६) देव, विनया आणि धनश्री शेजवलकर. २०१९. *पदज्योत्स्ना ३.* प्राथमिकसंस्कृतव्याकरणमधिकृत्य अभ्यासपुस्तिका. प्रथमावृत्तिः. पुणे: त्रिधारा प्रकाशन.

७) द्विवेदी, कपिलदेव. २०११. *प्रारम्भिक रचनानुवादकौमुदी.* तैंतीसवा संस्करण. वाराणसी: विश्वविद्यालय प्रकाशन.

## द्वितीय सत्र

## प्रश्नपत्र १ अनिवार्य विषय 19R3201/19E3201 वैदिक साहित्य

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी वैदिक साहित्याचा परिचय करून घेणे, तसेच ऋग्वेद आणि अथर्ववेद यांमधील निवडक सूक्तांचे सविस्तर अध्ययन करणे अपेक्षित आहे.

अ. वैदिक साहित्याचा परिचय– निर्मितीचा काळ, वैशिष्ट्ये आणि उपलब्ध साहित्याची तोंडओळख.

आ. चार वेद आणि त्यांच्या शाखा, संहिता, ब्राह्मणे, आरण्यके आणि उपनिषदे.

इ. वेदांगे– शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्दःशास्त्र आणि ज्योतिष.

ई. वैदिक देवता– इन्द्र, अग्नी, अश्विनौ, सोम, मरुद्गण, वरुण आणि आदित्यमण्डलांतील देवता, स्त्रीदेवता.

उ. ऋग्वेदसूक्ते– सवितृ (१.३५), उषस् (१.४८), मरुतः (१.८५), अश्विनौ (७.७१), नासदीय (१०.१२९)

ऊ. अथर्ववेदसूक्ते– मेधाजनन (१.१), राजासंवरण (३.४), शालानिर्माण (३.१२ ), वरुणः (४.१६), सर्पविषनाशन (५.१३)

**सन्दर्भग्रन्थसूची**


१) Winternitz, Maurice. 2004. *A History of Indian Literature*. Volume I. Delhi: MLBD.

२) Gonda, Jan. 1975. *A History of Indian Literature*. Volumes I and II. Wiesbaden: Otto Harrassowitz.

३) Keith, A. B. 1998. *A History of Indian Literature*. Reprint. Delhi: MLBD.

४) Telanga and B. B. Chaubey (tr.) 2005. *The New Vedic Selection*. Parts I and II. Reprint. Varanasi: Bharatiya Vidya Prakashan.

५) Bloomfield, Maurice. 1897. Hymns of the Atharvaveda. Delhi: MLBD.

६) Whitney, William Dwight (tr.) 1905. *Atharva-Veda Samhita*. 2 Volumes. Harvard Oriental Series. Cambridge, Massachusetts: Harvard University Press.

७) करंबळेकर, वि. वा. १९६३. *संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास.* नागपूर: श्री शारदा प्रकाशन

८) डांगे, सिंधु. १९७६. *भारतीय साहित्याचा इतिहास (खंड १).* नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रन्थनिर्मिती मंडळ.

९) वेलणकर, ह. दा. २००९. *ऋक्सूक्तवैजयन्ती.* पुनर्मुद्रण. पुणे: आदर्श संस्कृत शोध संस्था, वैदिक संशोधन मंडळ.


**प्रश्नपत्र २ अनिवार्य विषय 19R3202/19E3202 वैयाकरणसिद्धान्तकैमुदी**

प्रस्तुत विषयामध्ये पाणिनीय व्याकरणाचा परिचय होणे अपेक्षित आहे. पाणिनिविरचित अष्टाध्यायी, त्याची परंपरा आणि त्या परंपरेमध्ये पुढे निर्माण झालेली वैयाकरणसिद्धान्तकौमुदी यांचा सामान्य परिचय विद्यार्थ्यांनी करून घ्यावा. सिद्धान्तकौमुदीमधील संज्ञा आणि कारक या प्रकरणांचा सविस्तर अभ्यास विद्यार्थ्यांनी करावयाचा आहे.

**सन्दर्भग्रन्थसूची**


१) भागवत, वा. बा. १९८८. *पाणिनीय व्याकरणाचे अंतरंग.* पुणे: टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

२) Mahashabde, M. V. 1955. *Vaiyākaraṇasiddhāntakaumudī*. Mumbai: Jaya Prakashan.

३) Vasu, S. C. 1962. *Siddhāntakaumudī*. Vol. I. Delhi: Motilal Banarsidass.

४) Bhate, Saroja. 1989. *Vaiyākaraṇasiddhāntakaumudī*. Pune: BORI.

५) साठे, म. दा. १९६५. *वैयाकरणसिद्धान्तकौमुदी.* पुणे: संस्कृत विद्या परिसंस्था.

६) पणशीकर, वासुदेव लक्ष्मण. १९९४. *सिद्धान्तकौमुदी.* दिल्ली: चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान.

७) घिल्डियाल, श्रीधरानन्द. २००४. *वैयाकरणसिद्धान्तकौमुदी, विभक्त्यर्थप्रकरण.* दिल्ली: मोतीलाल बनारसीदास.

८) दूबे, सत्यप्रकाश. २००९. *वैयाकरणसिद्धान्तकौमुदी.* दिल्ली: न्यू भारतीय बुक कॉर्पोरेशन.

**प्रश्नपत्र ३ अनिवार्य विषय 19R3203/19E3203 मीमांसा–शाबरभाष्य**

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी प्राचीन भारतीय दर्शनांच्या परंपरेतील मीमांसादर्शनाचा परिचय करून घेणे अपेक्षित आहे. महर्षी जैमिनी यांनी रचलेल्या निवडक सूत्रांचा त्यावरील शबरस्वामींच्या भाष्यासह अभ्यास करावा.

अ. प्राचीन भारतीय दर्शनांच्या परंपरेचा परिचय.

आ. जैमिनिप्रणीत मीमांसासूत्रे आणि पूर्वमीमांसेच्या प्राचीन परंपरेची तोंडओळख

इ. शबरस्वामी आणि त्यांचे भाष्य– काळ आणि वैशिष्ट्ये

ई. मीमांसासूत्रांतील अध्याय १ मधील पाद १ आणि २ यांचे सविस्तर अध्ययन

**सन्दर्भग्रन्थसूची**

१) Jha, Ganganath (ed. & tr.) 1933. Shabara-Bhāṣya (Adhyāyas I–III). Vol. I. Baroda: Oriental Institute.

२) आनन्दाश्रमसंस्कृतग्रन्थावलिः. १९७६. *श्रीमज्जैमिनिप्रणीते मीमांसादर्शने प्रथमाध्यायस्य तर्कपादनाम प्रथमपादः*. पुणे: आनन्दाश्रम.

३) युधिष्ठिरमीमांसक (सम्पा. आणि अनु.) १९८७. *मीमांसाशाबरभाष्यम् हिन्दीव्याख्यासहितम्*. द्वितीयसंस्करणम्. बहालगढ.

४) शर्मा, उमाशंकर (अनु.) १९८०. *शाबरभाष्योपेतं मीमांसादर्शनम् (तर्कपादः)*. प्रथमावृत्तिः. वाराणसी: चौखम्बा सुरभारती प्रकाशन.

**प्रश्नपत्र ४ पायाभूत विषय 19R3204/19E3204 संस्कृत साहित्याचा इतिहास**

प्रस्तुत विषयामध्ये विद्यार्थ्यांनी रामायण, महाभारत आणि पुराणे या धार्मिक वाङ्मयाचा आणि विविध कवींनी रचलेल्या अभिजात संस्कृत साहित्याचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. अभ्यास करताना कवीचा काळ आणि काव्याचे ऐतिहासिक आणि वाङ्मयीन स्थान लक्षात घेणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे त्या त्या काव्याची स्थूलमानाने कथावस्तूदेखील माहीत करून घ्यावी.

अ. वेदोत्तर वाङ्मय परंपरा– आर्ष महाकाव्यांच्या रचनेमागील पार्श्वभूमी आणि प्रक्रिया, विकासाचे टप्पे

आ. रामायण आणि महाभारताचा काळ, साम्य-भेद आणि वैशिष्ट्ये, तुलनात्मक अध्ययन

इ. पुराणे– संख्या, रचना, काळ, लक्षणे आणि वैशिष्ट्ये

ई. काव्याचे प्रकार, विविध दृश्य आणि श्रव्य काव्यांचा परिचय, पंचमहाकाव्ये, कवी आणि त्यांच्या साहित्यकृतींचा अभ्यास

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अश्वघोष | भास | कालिदास | शूद्रक | विशाखदत्त | भवभूती |
| हर्ष | भारवी | भट्टनारायण | दण्डी | सुबन्धू | बाणभट्ट |
| माघ | राजशेखर | भर्तृहरी | श्रीहर्ष | कृष्णमिश्र | जयदेव |

उ. नीतिकथा, अद्भुतकथा आणि चम्पूवाङ्मय

ऊ. सुभाषिते आणि स्तोत्रवाङ्मय

ऋ. कोषवाङ्मय आणि शास्त्रीय वाङ्मय (अर्थशास्त्र, कामशास्त्र, नाट्यशास्त्र, ज्योतिर्गणित, गणित)

### सन्दर्भग्रन्थसूची


१) Winternitz, Maurice. *A History of Indian Literature*. Volumes I and II. Delhi: MLBD.

२) Gonda, Jan. 1975. *A History of Indian Literature*. 10 Volumes. Wiesbaden: Otto Harrassowitz.

३) Keith, A. B. *A History of Indian Literature*. Reprint. Delhi: MLBD.

४) करंबळेकर, वि. वा. १९६३. *संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास.* नागपूर: श्री शारदा प्रकाशन.


********